॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

*** सुविचार ***
यशाची गुरुकिल्ली म्हणजे
स्वतःला ओळखणं.

अहिल्यानगर | मंगळवार, दि. ८ सप्टेंबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक ७७ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

## मराठा विद्यार्थ्यांना ‘ओबीसी’प्रमाणे लाभ

**मुंबई । वीरभूमी –** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू असतानाच राज्य सरकारने मराठा, कुणबी आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) प्रवर्गातील विद्यार्थी व तरुणांसाठी महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. शिक्षणातील सवलती, रखडलेला वसतिगृह निर्वाह भत्ता, परदेशी शिक्षणासाठीची शिष्यवृत्ती आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण अशा विविध बाबींशी संबंधित चार महत्त्वाचे शासन निर्णय आणि प्रशासकीय आदेश जारी करण्यात आले आहेत.



या निर्णयांमुळे संबंधित विद्यार्थ्यांना आणि तरुणांना तातडीचा लाभ मिळण्याची शक्यता आहे. मात्र, मराठा आरक्षण, कुणबी नोंदी आणि हैदराबाद गॅझेटिअरचा मुद्दा यांसारख्या आंदोलनातील प्रमुख मागण्यांवर अद्याप अंतिम तोडगा निघालेला नाही. त्यामुळे सरकारच्या या निर्णयांनंतर आंदोलनाची पुढील दिशा काय असेल, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. सरकारच्या ताज्या निर्णयांकडे एकत्रितपणे पाहिल्यास शिक्षण, आर्थिक मदत, परदेशी शिक्षण आणि रोजगार या चार प्रमुख क्षेत्रांवर भर देण्यात आल्याचे दिसते. मराठा विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणात ओबीसी प्रमाणे उपलब्ध सवलतींचा लाभ देण्याचा निर्णय, वसतिगृह निर्वाह भत्त्यासाठी २०० कोटींची तरतूद, सारथीच्या परदेशी शिष्यवृत्तीतील बदल आणि १,४४० तरुणांसाठी मोफत वाहन प्रशिक्षण हे या निर्णयांचे प्रमुख भाग आहेत.

### सरकारचे चार महत्त्वाचे निर्णय

**मराठा विद्यार्थ्यांना ओबीसी प्रमाणे शैक्षणिक सवलती**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून तंत्रशिक्षण घेणाऱ्या मराठा समाजातील विद्यार्थ्यांना ओबीसी विद्यार्थ्यांप्रमाणे उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सवलती आणि सुविधांचा लाभ देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तंत्रशिक्षण संचालनालयाने संबंधित विभागीय कार्यालये आणि विद्यापीठांना याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यामुळे शुल्क, शैक्षणिक योजना आणि इतर सुविधांचा लाभ पात्र विद्यार्थ्यांना मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे.

**वसतिगृह निर्वाह भत्त्यासाठी २०० कोटींचा निधी**

ईबीसी, ईडब्ल्यूएस आणि एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा रखडलेला वसतिगृह निर्वाह भत्ता देण्यासाठी सरकारने २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना ही प्रलंबित रक्कम वितरित केली जाणार आहे. त्यामुळे वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या अडचणीतील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

**परदेशी शिक्षणासाठी सारथीच्या शिष्यवृत्तीत बदल**

सारथीच्या परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती योजनेत महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत. परदेशातील विद्यापीठांची शिक्षण फी थेट संबंधित संस्थेला देण्याची तरतूद करण्यात आली असून शिष्यवृत्तीवरील कमाल आर्थिक मर्यादाही हटवण्यात आली आहे. याशिवाय अतिरिक्त खर्चासाठी दरवर्षी १,५०० अमेरिकन डॉलर, तर ब्रिटनमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १,१०० जीबीपी भत्त्याची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठांची निवड आणि गुणवत्तेचे निकष ठरवण्यासाठी दर क्रमवारीवर आधारित पद्धतीचा वापर केला जाणार आहे.

**१४४० मराठा-कुणबी तरुणांना मोफत वाहन प्रशिक्षण**

सारथी आणि पिंपरी-चिंचवड येथील आयडीटीआरएस संस्थेच्या माध्यमातून १,४४० मराठा-कुणबी तरुणांना मोफत वाहनचालक आणि वाहक प्रशिक्षण दिले जाणार आहे. एलएमव्ही आणि एचएमव्ही वाहनांसह वाहकाचे प्रशिक्षणही या उपक्रमात समाविष्ट आहे. प्रशिक्षणाला १ ऑक्टोबर २०२६ पासून सुरुवात होणार असून प्रशिक्षण पूर्ण केलेल्या किमान १,००० लाभार्थ्यांना रोजगार किंवा स्वयंरोजगार मिळवून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## राज्यावर वीजसंकट!



**चंद्रपूर । वीरभूमी –** पावसाने बऱ्यापैकी विराम घेतल्याने उष्णतेत वाढ होत आहे. त्यामुळे विजेची मागणी वाढण्याची शक्यता असतानाच महानिर्मितीच्या सात वीज केंद्रांत सरासरी नऊ दिवस पुरेल इतकाच एवढा कोळसासाठा शिल्लक असल्याची माहिती आहे. महानिर्मितीला कोळशाचे व्यवस्थापन करीत वीजनिर्मिती करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. यावर उपाय म्हणून येत्या १५ सप्टेंबरपासून विदेशी कोळशाची आयात होण्याचे स्पष्ट संकेत येत आहेत.

राज्यात महानिर्मितीची चंद्रपूरसह कोरडी, खापरखेडा, पारस, भुसावळ, परळी व नाशिक येथे केंद्रे आहेत. कोळसा संकट आल्याने या केंद्रांत अतिरिक्त साठा होऊ शकलेला नाही. त्यातच काही भागांत पावसामुळे कोळशाचा पुरवठा प्रभावित झाला आहे. सध्या महानिर्मितीच्या केंद्रात दररोज सरासरी वीसहून अधिक कोळसा रॅक्स प्राप्त होत आहेत. ही घटलेली आवक आहे. वाहतुकीने येणारा कोळसा वेळप्रसंगी ओला झाल्यास वीजनिर्मितीवेळी सयंत्रांची झीज होते. त्याचा वीजनिर्मितवर प्रचंड परिणाम होतो.

यंदा उन्हाळा लवकर आला आहे. त्यामुळे वीज मागणी १५ टक्क्यांनी वाढली. त्यातच मुसळधार पावसामुळे काही भागांत कोळसा खाणीतून काढता आला नाही. इंडोनेशियाने कोळसा निर्यात बंद केल्याने भारतातील आयातीवर त्याचा परिणाम झाला. आता संकट गडद होऊ नये म्हणून कोळसा आयतीचा निर्णय घेण्यात आला आहे. आयातीतून दरमहा अपेक्षित असलेल्या कोळशाचे नेमके प्रमाण किती असेल हे तूर्त स्पष्ट झालेले नाही.

राज्याची २५ टक्के गरज पूर्ण करणाऱ्या येथील चंद्रपूर वीज केंद्रातून रविवारी दुपारी १ हजार ८१६ मेगावॉट वीजनिर्मिती झाली. या केंद्राची स्थापित क्षमता २ हजार ९२० मेगावॅटची आहे. केंद्राने ६२ टक्के वीजनिर्मिती केली. राज्याची विजेची मागणी रविवारी दुपारी २६ हजार ८८७ मेगावॉटपर्यंत पोहचली होती. त्यावेळी महानिर्मितीच्या सात वीज औष्णिक वीज केंद्रांतून ५ हजार १९७ मेगावॅट वीजनिर्मिती केली जात होती.

## फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### व्यवस्था

उत्पन्न कमी खर्च जास्त
सर्वांनाच पडते कोडे
दुःख असूनही हसताना
दामटावे लागते घोडे
हे बरोबर अन ते चूक
हीच सगळ्यांची अवस्था
आर करू की पार करू?
इथली जीवघेणी व्यवस्था !

## SPOT NEWS

### ‘लालपरी’ उत्पन्नात ६६ कोटींची वाढ

**मुंबई –** जुलै महिन्याच्या तुलनेत ऑगस्टमध्ये एसटीच्या उत्पन्नात तब्बल ६६ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. उत्पन्नवाढीसाठी सुचविलेल्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू झाल्याने एसटीच्या तोट्याचे प्रमाणही कमी होऊ लागले आहे. आगामी काही महिन्यांत एसटीचा चालू तोटा भरून काढण्याच्या दिशेने महामंडळाची वाटचाल सुरू असल्याचा विश्वास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला. एसटीचे प्रत्येक आगार हे त्या परिसरातील सर्वसामान्य जनतेला प्रवासी सेवा देण्यासाठी निर्माण करण्यात आले आहे. एसटीच्या एकूण प्रवाशांपैकी तब्बल ८५ टक्क्यांहून अधिक प्रवासी १०० किलोमीटरच्या आतील अंतरात प्रवास करतात. त्यामुळे प्रत्येक आगाराने आपल्या कार्यक्षेत्रातील प्रवाशांची गरज ओळखून त्यानुसार वाहतूक नियोजन करणे आवश्यक आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत याकडे अपेक्षित लक्ष न देता लांब पल्ल्याच्या, तुलनेने अनुत्पादक फे-यांवर अधिक भर दिला जात होता. त्यामुळे प्रवासी संख्या आणि उत्पन्नाच्या तुलनेत खर्च अधिक होऊन एसटीच्या तोट्यात भर पडत होती. मागील महिन्यात उत्पन्नवाढीचा आढावा घेताना मंत्री सरनाईक यांनी ही बाब स्पष्टपणे निदर्शनास आणून दिली होती.

### ‘बिग बॉस २०’ची धमाकेदार ओपनिंग!

**मुंबई –** रिॲलिटी शो विश्वातील सर्वात मोठा आणि बहुचर्चित शो ‘बिग बॉस २०’चा ग्रँड प्रीमियर ६ सप्टेंबर रोजी मोठ्या थाटामाटात पार पडला. बॉलीवूडचा दबंग स्टार सलमान खानने या मैलाचा दगड ठरणा-या २०व्या सीझनमध्ये मनोरंजन, क्रीडा, संगीत आणि डिजिटल जगतातील तब्बल १७ स्पर्धकांचे घरात स्वागत केले.

## महापुरुषांच्या रांगेत पंतप्रधानांचा फोटो नको : राज ठाकरे यांचे मत

**ठाणे । वीरभूमी –** राज्यातील जनतेना वेगळ्या गोष्टीमध्ये गुंतवण्याचे काम सुरू आहे. देशात धर्मांची झिंग आली आहे, देवावरची श्रद्धा, धर्माबद्दलचा अभिमान इतके आपण समजू शकतो पण माणसांनी धर्मांध असू नये. आपल्या धर्माचा आपल्याला अभिमान असला पाहिजे.

राज ठाकरे म्हणाले की, काही लोक टीव्हीवर येतात आणि जे तोंडाला येते ते लोकांना सांगत असतात. राम आणि रावणाचे जेव्हा युद्ध झाले त्यावेळी रावणाची १ लाख मुलं आणि दीड लाख नातू मारले गेले. मला जितकं माहिती आहे की रावणाला केवळ १० तोंडं होती. एक लाख मुलं होती. काहीही स्टो-या हे लोक सांगत असतात. देश कुठे चालला आहे आणि हे लोक भस्म लावत काय स्टोरी सांगत आहेत.

राज ठाकरे म्हणाले की, २०२१ मध्ये देशातील ज्या परदेशी कंपन्या भारतात आल्या होत्या त्यामधील ५०० कंपन्यांनी देशातील आपले कामकाज बंद केले आहे. यातून किती नोक-या गेल्या याचा अंदाज बांधला पाहिजे, हा केंद्र सरकारचा डेटा आहे, मी तयार केला नाही. देशात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढत आहे.

राज ठाकरे म्हणाले की, आता गणपतीचे दिवस आहेत. या दिवसांमध्ये दंगली घडवल्या जाण्याची शक्यता आहे. देशभरात हेच सुरू आहे, जेणेकरून तुम्ही त्यामध्येच अडकले पाहिजे आणि दुसऱ्या गोष्टीकडे तुमचे लक्ष जाऊ नये. मुंबईत तुम्ही याची झलक पाहिली आहे. माझे मुस्लिम आणि हिंदू दोघांनाही सांगणे आहे की यात पडू नका.

## ‘एमपीएससी’ विद्यार्थ्यांचा पुण्यात आक्रोश मोर्चा!

**पुणे । वीरभूमी –** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कारभारातील कथित ढिसाळपणा, पेपरफुटी आणि निकालातील गोंधळाविरोधात आज पुण्यात एमपीएससीच्या हजारो विद्यार्थ्यांनी भव्य ‘आक्रोश मोर्चा’ काढला.



मोर्चात सहभागी झाल्यानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारवर तीव्र शब्दांत टीका केली. मुलं रस्त्यावर उतरलेली असताना सरकारने त्यांचे ऐकून तरी घ्यायला हवे, चर्चेला बसायला हवे. विद्यार्थ्यांचा अर्धा वेळ अभ्यासिकेऐवजी रस्त्यावर आंदोलने करण्यात जात आहे, हे सरकारचे मोठे अपयश आहे, असा घणाघात सुळेंनी केला.

पेपरफुटीबाबत बोलताना त्या म्हणाल्या की, देशात ‘टोफेल’ आणि ‘जीआरई’ सारख्या परीक्षा होतात, तिथे पेपर फुटत नाहीत. एआय तंत्रज्ञान असतानाही पेपर फुटणे थांबत नाही, यावर माझा विश्वास नाही. तसेच, देशात आणि राज्यात सुरू असलेल्या आर्थिक संकटावरून लक्ष विचलित करण्यासाठीच सरकार दोन धर्मांमध्ये भांडणे लावत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

सरकारने हट्टीपणा सोडून जबाबदार व्यक्तीला पाठवून विद्यार्थ्यांशी चर्चा करावी आणि जंतर-मंतर सारखा उद्रेक टाळावा, असे आवाहन त्यांनी केले.

## न्यायालयाच्या आदेशानुसारच ध्वनीक्षेपकाचा आवाज ठेवा

### नियमांचे उल्लंघन केल्यास यंत्रणा जप्त करून गुन्हे दाखल करण्याचा पाथर्डी पोलिसांचा इशारा

**पाथर्डी । वीरभूमी –** डीजे व ध्वनीक्षेपकाच्या आवाजावर न्यायालयाच्या आदेशानुसार आणि शासनाच्या नियमानुसार मर्यादा पाळणे बंधनकारक आहे. निर्धारित डेसिबल मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या सार्वजनिक मंडळांसह खासगी कार्यक्रम आयोजकांवरही कोणताही दुजाभाव न करता कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी दिला.

आगामी गणेशोत्सव, नवरात्रोत्सव तसेच अन्य कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर पाथर्डी तालुका डीजे असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक कोकरे यांची भेट घेतली. यावेळी ते बोलत होते. असोसिएशनचे अध्यक्ष नयूम शेख, राजेंद्र दगडखैर, अक्षय देहडराय, आवेज शेख, मिलिंद काळे, निखिल काकडे, ब्रह्मा शिरसाट, संकेत बोरुडे तसेच गोपनीय विभागाचे नागेश वाघ आदी उपस्थित होते.

यावेळी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी न्यायालयाच्या आदेशाचे पालन करून दोन बेस व दोन टॉप वापरत डीजेचा आवाज मर्यादित ठेवण्याचे आश्वासन दिले. ध्वनीक्षेपकामुळे नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, याची काळजी घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

बाहेरील तालुके व जिल्ह्यांमधून येणारे काही डीजे चालक नियमांचे उल्लंघन करून गोंधळ घालत असल्याची तक्रार पदाधिकाऱ्यांनी केली. अशा चालकांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच कर्ज काढून व्यवसाय सुरू केल्याने प्रशासनाने डीजे व्यावसायिकांना सहकार्य करावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी सर्वांनी नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले. कायदा मोडणाऱ्यांवर कोणताही दुजाभाव न करता एकसमान कारवाई केली जाईल. न्यायालयाचे आदेश तसेच जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून आगामी सण-उत्सव आनंदाने साजरे करावेत, असे त्यांनी सांगितले.



नियमांचे उल्लंघन केल्यास ध्वनीक्षेपकाची यंत्रणा जप्त करून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येतील. तसेच रात्री १० नंतर कोणत्याही परिस्थितीत ध्वनीक्षेपक वाजवला जाणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

## SPOT NEWS

### शिर्डीत ८ सप्टेंबर पासून राष्ट्रीय गो चॅम्पियनशिपचा थरार

**• कोपरगाव । वीरभूमी –**
इंडो ॲमेच्युअर गो असोसिएशनच्या तत्वावधानाखाली व गो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राच्या वतीने नॅशनल गो चॅम्पियनशिप २०२६ चे आयोजन ८ ते १० सप्टेंबरदरम्यान साई संस्थान क्रीडा संकुल, शिर्डी येथे करण्यात आले आहे. या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातील २० हून अधिक राज्यांमधील ३०० पेक्षा अधिक अव्वल क्रमांकाचे खेळाडू सहभागी होणार आहेत. स्पर्धेचा भव्य उद्घाटन सोहळा ८ सप्टेंबर रोजी सकाळी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गाडिलकर यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून, इंडो ॲमेच्युअर गो असोसिएशनचे कार्यकारी सचिव चंदन पांडे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. इंडियन फ्लोर बॉल असोसिएशनचे सचिव रविंद्र चौथवे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून, गो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष अहमद लालानी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याबाबत आयोजन सचिव अनिल सहारे यांनी सांगितले की, शिर्डीच्या पावन भूमीत राष्ट्रीय स्तरावरील ही स्पर्धा होत असल्याने महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे. तरुण पिढीला बौद्धिक खेळांकडे आकर्षित करणे हा या स्पर्धेचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय गो फेडरेशनच्या नियमानुसार ही स्पर्धा होणार असून, विजेत्या खेळाडूंना पारितोषिक, ट्रॉफी, पदक तसेच राष्ट्रीय क्रमवारीत स्थान मिळणार आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने शिर्डीला देशभरातील अव्वल गो खेळाडूंच्या बौद्धिक कौशल्याचा थरार अनुभवता येणार आहे.

### श्री सद्गुरू गंगागीर महाराज महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात

**• कोपरगाव । वीरभूमी –**
रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरु गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स व संजीवनी कॉमर्स कॉलेजमध्ये भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने कला, वाणिज्य व विज्ञान विभागातील इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिका साकारत अध्यापन केले. विद्यार्थ्यांनी मनोगतातून शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करून त्यांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे होते. अध्यक्षीय मनोगतात ते म्हणाले, विद्यार्थी म्हणून शिकणे सोपे आहे; परंतु शिक्षक बनून इतरांना शिकवणे कठीण असते. शिक्षक देशाची भावी पिढी कर्तव्यदक्ष, सक्षम व संस्कारक्षम करण्याचे उदात्त काम तळमळीने करत असतो. याचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांनी आज घेतला. विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे केलेले नियोजन कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी वरिष्ठ वाणिज्य विभागप्रमुख डॉ. अर्जुन भागवत, कला विभागप्रमुख डॉ. बंडेराव तऱ्हाळ, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य रवींद्र हिंगे, पर्यवेक्षक माधव रेवगडे, कलावती देशमुख, शांतीलाल अग्रवाल, अण्णासाहेब गोराणे, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. सुनीता आत्रे आदी उपस्थित होते. शिक्षकांच्या भूमिकेत येवले भूमिका, सोनार साई, पाटील समृद्धी, जामदार तृप्ती, होले निकिता, रोहम श्लोक, प्रियदर्शनी पिंपळे व इतर विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अक्षदा गायकवाड हिने केले. सूत्रसंचालन अपूर्वा चव्हाण व विद्या सावंत यांनी केले, तर आभार शाक्यवंशिका वाघ हिने मानले.

# दैत्य नांदूर येथे यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

**श्री निंबादैत्य महाराज सार्वजनिक वाचनालयाचा उपक्रम । स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना अभ्यासाची प्रेरणा**

**• पाथर्डी । वीरभूमी –**
तालुक्यातील दैत्य नांदूर येथील विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात मिळविलेल्या उल्लेखनीय यशाचा गौरव करण्यासाठी श्री निंबादैत्य महाराज सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. विविध जिल्हा परिषदांमध्ये प्राथमिक शिक्षकपदी निवड झालेल्या गावातील चार विद्यार्थ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



दैत्य नांदूर येथील अनिरुद्ध भागवत सोनवणे व भारत विठ्ठल घुगे यांची पालघर जिल्हा परिषदेत, मनाली भगवान पालवे यांची अहिल्यानगर जिल्हा परिषदेत, तर मोनिका विठ्ठल बुगे यांची पुणे जिल्हा परिषदेत प्राथमिक शिक्षकपदी निवड झाली. त्यांच्या या यशाबद्दल शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक परीक्षेत मिळविलेले हे यश इतर युवकांसाठी प्रेरणादायी असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

यावेळी बोलताना दिगंबर गाडे यांनी, सध्याचे युग स्पर्धेचे असून सातत्याने मेहनत, चिकाटी आणि योग्य नियोजनाने अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना यश निश्चित मिळते, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी केवळ पदवीपर्यंत शिक्षण न थांबविता विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करून आपले ध्येय निश्चित करावे, असे आवाहन त्यांनी केले.

श्री निंबादैत्य महाराज सार्वजनिक वाचनालयात स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक विविध पुस्तके उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असेही गाडे यांनी सांगितले. गावातील युवकांनी वाचनाची सवय जोपासून नियमित अभ्यास केल्यास भविष्यात विविध शासकीय सेवांमध्ये दैत्य नांदूरचे नाव उज्वल होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या सत्कार समारंभास उपसरपंच भागवत वाघ, राजेंद्र दहिफळे, आदिनाथ दहिफळे, विकास वाघ, विठ्ठल घुगे सर, सुरेश आव्हाड, कानिफराव देशमुख, सतीश गाडे, बंडू नाना खबायत यांच्यासह ग्रामस्थ, पालक, विद्यार्थी व वाचनालयाचे पदाधिकारी उपस्थित होते.

### गौरी शुगरला तांत्रिक कार्यक्षमतेचा मानाचा पुरस्कार; ओंकार शुगर समूहाचा चेन्नईत गौरव



**• श्रीगोंदा । वीरभूमी–**
गाळप हंगाम २०२५–२६ मध्ये उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता, प्रभावी कारखाना व्यवस्थापन आणि उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल गौरी शुगर अँड डिस्टिलरीज प्रा. लि., बाजोळगा (युनिट क्रमांक १३) यांना दक्षिण भारतीय ऊस व साखर तंत्रज्ञ संघटनेतर्फे 'तांत्रिक कार्यक्षमतेतील उत्कृष्ट कारखाना कामगिरी' पुरस्काराने गौरविण्यात आले.

चेन्नई येथे झालेल्या दक्षिण भारतीय ऊस व साखर तंत्रज्ञ संघटनेच्या ५५व्या वार्षिक अधिवेशनात हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ओंकार शुगरचे संचालक ओमराजे बाबुराव बोत्रेपाटील यांनी समूहाच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी युनिट क्रमांक १३चे अधिकारी उपस्थित होते.

चेअरमन बाबुराव बोत्रेपाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गौरी शुगरने उपलब्ध साधनसामग्रीचा प्रभावी वापर, उत्पादन प्रक्रियेतील कार्यक्षमता, तांत्रिक व्यवस्थापन तसेच गुणवत्तापूर्ण उत्पादनाच्या बाबतीत उल्लेखनीय कामगिरी बजावली. याच कामगिरीची दखल घेत संघटनेने कारखान्याला हा पुरस्कार प्रदान केला.

हा पुरस्कार म्हणजे केवळ कारखान्याच्या तांत्रिक कार्यक्षमतेचा गौरव नसून अधिकारी, कर्मचारी, कामगार आणि ऊस उत्पादक शेतकरी यांच्या एकत्रित प्रयत्नांची पावती असल्याची भावना व्यवस्थापनाने व्यक्त केली.

गौरी शुगरच्या या यशामुळे ओंकार शुगर समूहाच्या कार्यक्षम व्यवस्थापनाची आणि तांत्रिक गुणवत्तेची पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली आहे.

### पीएमश्री शाळेत पर्यावरणपूरक गणपती कार्यशाळा

**'मातीचा गणपती... निसर्गाची जपणूक'चा दिला संदेश**

**• पाथर्डी । वीरभूमी –**
गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याबरोबरच पर्यावरण संवर्धनाची जनजागृती आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने श्री आनंद महाविद्यालय व शुभंकरोती ऑर्गनायझेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील पीएमश्री जिल्हा परिषद शाळेत पर्यावरणपूरक गणपती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती तसेच रासायनिक रंगांचा वाढता वापर यामुळे जलप्रदूषणासह पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी, विशेषतः विद्यार्थ्यांनी मातीपासून गणेशमूर्ती तयार करून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, या उद्देशाने कार्यशाळा घेण्यात आली.

कार्यशाळेत मातीपासून आकर्षक गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने सुबक गणेशमूर्ती साकारल्या. 'मातीचा गणपती... निसर्गाची जपणूक...' या संकल्पनेतून गणेशभक्ती आणि निसर्गप्रेम यांचा सुंदर संगम साधत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

मातीची गणेशमूर्ती विसर्जनानंतर सहजपणे विरघळत असल्याने जलस्रोतांचे प्रदूषण टाळण्यास मदत होते. त्यामुळे पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची चळवळ घराघरांत पोहोचविण्यासाठी ही कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरली.

यावेळी प्रा. सूर्यकांत काळोखे, जयश्री काळोखे, केंद्रप्रमुख सविता कुटे, तेजस बडे, सोमनाथ केकाण, सागर आंधळे, सिद्धार्थ शिरसाठ, रेहान शेख व मुख्याध्यापक राजू गोल्हार यांनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेसाठी मुख्याध्यापिका नंदा तुपे, छाया चंदनशिव, मनीषा फटांगरे, मंदा पालवे, सुरेखा बडे, भावना देवरे, ज्योती जाधव, कविता शिरसाट व ज्योती भोसले यांनी विशेष परिश्रम घेतले.

शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांमध्येही या कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले असून, गणेशोत्सवाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला पाथर्डीकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली.

# संजीवनी युवा प्रतिष्ठानकडून दहीहंडीचा भव्य खर्च टाळून बक्षिसाची रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा

**• कोपरगाव । वीरभूमी–**
शहरात आ. विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित श्री छत्रपती शिवाजी महाराज मानाची दहीहंडी यंदा साध्या स्वरूपात साजरी करण्यात आली. मात्र देशातील विविध भागांमध्ये निर्माण झालेल्या नैसर्गिक आपत्तीजन्य परिस्थितीची जाणीव ठेवून उत्सवावरील अनावश्यक खर्च टाळत त्यातील बक्षिसाची रक्कम आपत्तीग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्याचा सामाजिक निर्णय घेण्यात आला. दहीहंडी रद्द न करता उत्सवाची परंपरा कायम ठेवत सामाजिक बांधिलकीला प्राधान्य देण्यात आले.



संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या वतीने मागील दोन वर्षांत दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात आणि धडाकेबाज पद्धतीने साजरा करण्यात आला होता. यंदाही दहीहंडीची परंपरा कायम ठेवण्यात आली; मात्र देशातील विविध भागातील नैसर्गिक आपत्तीजन्य परिस्थितीची जाणीव ठेवून भव्य आयोजनावरील खर्च टाळून तो मदतकार्यासाठी वळविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे परंपरेला छेद न देता उत्सवातून माणुसकीचा संदेश देण्यात आला.

कोपरगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे गोपाळकाल्याच्या पावन पर्वानिमित्त श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या मानाच्या दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. राष्ट्रसंत जनार्दन स्वामी आश्रमाचे मठाधिपती परमपूज्य रमेशगिरीजी महाराज यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात दहीहंडी फोडण्यात आली. यावेळी उत्सवातील बक्षिसाची रक्कम देशातील पूरग्रस्त बांधवांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे चेकद्वारे सुपूर्द करण्यात आली. संकटाच्या काळात उत्सवाचा आनंद कायम ठेवत गरजूंच्या मदतीसाठी हात पुढे करण्याचा हा उपक्रम सामाजिक संवेदनशीलतेचा आदर्श ठरला.

कार्यक्रमादरम्यान इस्कॉनच्या भजनी मंडळाने भक्तिमय भजनांचे सादरीकरण केले. परमपूज्य रमेशगिरीजी महाराज यांनीही भजन सादर केल्याने कार्यक्रमस्थळी भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

यावेळी नायब तहसीलदार सौ. प्रफुल्लिता सातपुते मॅडम यांच्यासह युवासेवक, प्रतिष्ठानचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पारंपरिक दहीहंडी उत्सवाची सांगड सामाजिक बांधिलकीशी घालत यंदाचा उत्सव साध्या स्वरूपात साजरा करण्यात आला.उत्सवाची परंपरा कायम ठेवत जळोषासोबत सामाजिक जबाबदारीची जाणीव जपण्याचा संजीवनी युवा प्रतिष्ठानचा निर्णय कोपरगावच्या सामाजिक संवेदनशीलतेचे दर्शन घडवणारा ठरला.

### माढेकर महाराजांनी घेतले मळगंगा देवीचे दर्शन; रांजणखळगे परिसराचीही पाहणी



**• निघोज । वीरभूमी–**
राज्यातील जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या मळगंगा देवीचे दर्शन घेऊन श्रीगुरु श.ब्र. १०८ शिवाचार्य माढेकर महाराज यांनी आशीर्वाद घेतला. यावेळी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त बबनराव ससाणे, व्यवस्थापक महेश ढवळे, पत्रकार योगेश खाडे, देवीचे पुजारी सुनील गायखे व संतोष गायखे, पत्रकार जयसिंग हरेल आणि निलेश जंगम यांच्या हस्ते माढेकर महाराज यांचा सत्कार करण्यात आला.

माढेकर महाराज निघोज येथे जंगम समाजाचे ज्येष्ठ मार्गदर्शक माहेश्वरमूर्ती शिवैक्य बाबुराव दिगंबर जंगम (नाना) यांच्या प्रथम पुण्यतिथी कार्यक्रमासाठी आले होते. यावेळी त्यांनी मळगंगा देवीचे दर्शन घेतल्यानंतर जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसराला भेट दिली. तेथील मळगंगा देवी मंदिरात पूजा करून त्यांनी दर्शन घेतले.

माढेकर महाराज म्हणाले, मळगंगा मातेचा अगाध महिमा ग्रंथांच्या माध्यमातून उपलब्ध असून, देवीच्या साक्षात्काराच्या कथा सर्वपरिचित आहेत. देवीचे स्थान असलेला हा परिसर मातेच्या आशीर्वादाने सुख-समृद्धीने नटलेला आहे. जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसर हा राज्याचा अनमोल पर्यटन ठेवा असून, या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विकास होण्याची गरज आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# शेवगावात सार्वजनिक वाचनालये कागदावरच?

## ५४ पैकी अनेक वाचनालये नियमित सुरू नसल्याच्या तक्रारी । अनुदानाच्या विनियोगाची चौकशी करण्याची वाचकांची मागणी

■ अमोल कराळे

**● शेवगाव । वीरभूमी –** ग्रामीण भागातील नागरिक, विद्यार्थी व तरुणांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि ज्ञानाचा प्रसार व्हावा, यासाठी शासनाकडून सार्वजनिक वाचनालयांना अनुदान दिले जाते. मात्र, शेवगाव तालुक्यातील अनेक वाचनालये प्रत्यक्षात नियमित सुरू नसल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. काही ठिकाणी वाचनालयाचा साधा फलकही नसतो, वर्तमानपत्रे, मासिके व नवीन पुस्तके उपलब्ध नसतात, तर काही ठिकाणी वाचनालयाच्या खोल्यांचा अन्य कारणांसाठी वापर होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे शासनाच्या निधीतून सुरू असलेली वाचनालये नेमकी वाचकांसाठी आहेत की केवळ अनुदानासाठी, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

तालुक्यात सार्वजनिक वाचनालयांची संख्या ५४ आहे. उपलब्ध माहितीनुसार यापैकी ५० वाचनालये कार्यक्षम, तर चार अकार्यक्षम असल्याचे सांगितले जाते. या वाचनालयांना त्यांच्या वर्गवारीनुसार शासनाकडून अनुदान दिले जाते. 'अ' वर्गातील एक वाचनालय असून, त्यासाठी सुमारे ४ लाख ६० हजार ८०० रुपयांची अनुदानाची तरतूद आहे. 'ब' वर्गातील आठ वाचनालयांना सुमारे ३ लाख ७ हजार रुपये, 'क' वर्गातील १५ वाचनालयांना सुमारे १ लाख ५३ हजार रुपये, तर 'ड' वर्गातील २६ वाचनालयांना वार्षिक सुमारे ४८ हजार रुपये अनुदान मिळते. वर्गवारीनुसार कर्मचारी संख्याही निश्चित करण्यात आली आहे.

वाचनालयांना मिळणाऱ्या अनुदानातील ५० टक्के रक्कम कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी, २५ टक्के रक्कम पुस्तक खरेदीसाठी, तर उर्वरित २५ टक्के रक्कम इतर खर्चासाठी वापरणे अपेक्षित आहे. वाचनालयात वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके तसेच वाचनीय व दर्जेदार पुस्तके उपलब्ध असणे आवश्यक आहे. मात्र, प्रत्यक्षात या नियमांचे कितपत पालन होते, याची तपासणी होणे गरजेचे असल्याचे वाचकांचे म्हणणे आहे.

'अ' व 'ब' वर्गातील वाचनालये सहा तास, तर 'क' व 'ड' वर्गातील वाचनालये किमान तीन तास सुरू ठेवणे अपेक्षित आहे. प्रत्यक्षात ग्रामीण भागातील अनेक वाचनालये नियमित वेळेत सुरू नसल्याच्या तक्रारी आहेत. काही गावांमध्ये वाचनालय असल्याचे दर्शविणारा साधा फलकही आढळत नसल्याचे सांगितले जाते. वार्षिक तपासणीच्या वेळीच फलक लावले जात असल्याच्या तक्रारीही आहेत. त्यामुळे तपासणी केवळ कागदोपत्री न राहता अचानक आणि प्रत्यक्ष ठिकाणी करण्यात यावी, अशी मागणी वाचकांकडून होत आहे.

वाचनालय चालकांच्या म्हणण्यानुसार, मिळणारे अनुदान कमी असून त्यातून कर्मचाऱ्यांचे वेतन, पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके व इतर खर्च भागविणे अवघड जाते. मात्र, सध्याचे अनुदान अपुरे असल्यास शासनाने त्याचा फेरविचार करणे गरजेचे आहे. ज्या गावांमध्ये वाचनालयाचा प्रत्यक्ष वापर अत्यल्प आहे, अशा दोन–तीन गावांसाठी एकत्रित वाचनालयाची संकल्पना राबविल्यास खर्चात बचत होऊन उपलब्ध निधीतून अधिक दर्जेदार पुस्तके व साहित्य वाचकांना उपलब्ध करून देता येऊ शकते, अशी भूमिका वाचकांनी मांडली आहे.

काही ठिकाणी वाचनालयासाठी असलेल्या खोल्यांमध्ये वाचनाशी संबंध नसलेले व्यवसाय अथवा अन्य उपक्रम सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शासनाच्या निधीतून उपलब्ध झालेली जागा व सुविधा वाचनासाठी वापरली जात नसेल, तर त्याची जबाबदारी निश्चित करण्याची गरज असल्याचेही वाचकांनी सांगितले.

वाचनालयांची तपासणी करण्यासाठी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाची यंत्रणा आहे. अहिल्यानगर येथील भुतकरवाडी परिसरातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात तीन अधिकारी उपलब्ध असल्याची माहिती आहे. वर्षातून एकदा नियमित तपासणी केली जाते. तसेच तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित वाचनालयाची तपासणी करण्याची तरतूद आहे.

मात्र, वर्षातून एकदा होणाऱ्या नियमित तपासणीत वाचनालयाची प्रत्यक्ष स्थिती, कर्मचारी उपस्थिती, वाचनालय सुरू असण्याची वेळ, उपलब्ध पुस्तके, वर्तमानपत्रे व मासिके, पुस्तक खरेदीचा खर्च, वाचकांची उपस्थिती आणि अनुदानाचा प्रत्यक्ष विनियोग याची काटेकोर तपासणी होते का, असा प्रश्न वाचकांकडून उपस्थित केला जात आहे.

काही वाचनालय चालकांकडून तपासणी यंत्रणेतील अधिकाऱ्यांशी संगनमत करून केवळ अनुदान मिळविण्यासाठी कागदोपत्री पूर्तता केली जात असल्याचे आरोप नागरिकांकडून केले जात आहेत. या आरोपांची वरिष्ठ पातळीवर स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.


तालुक्यात बोटावर मोजता येतील इतकीच वाचनालये समाधानकारकपणे सुरू असल्याचे वाचकांचे म्हणणे आहे. काही वाचनालयांत नियमित वाचक, वर्तमानपत्रे, मासिके, नवीन पुस्तके आणि वाचनासाठी आवश्यक वातावरण आहे. मात्र, दुसरीकडे अनेक ठिकाणी वाचनालये केवळ कागदोपत्री सुरू असल्याच्या तक्रारी आहेत. यामुळे प्रामाणिकपणे वाचनालय चालविणाऱ्या संस्थांचीही कोंडी होत असल्याचे वाचकांचे म्हणणे आहे.

मोबाईल आणि सोशल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे तरुण पिढी वाचनापासून दूर जात असल्याचे चित्र आहे. परिणामी अनेक वाचनालयांत ज्येष्ठ नागरिक व मोजके नियमित वाचक एवढीच उपस्थिती राहिल्याचे सांगितले जाते. मात्र, वाचकसंख्या कमी असल्याचे कारण देऊन पुस्तके, मासिके व साप्ताहिकांची खरेदी न करणे किंवा कर्मचारी न ठेवणे हा त्यावरील उपाय ठरू शकत नाही. उलट, अशा परिस्थितीत वाचनालयांनी विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा साहित्य, रोजगारविषयक पुस्तके, मराठी साहित्य, चरित्रे, विज्ञानविषयक पुस्तके आणि नव्या लेखकांचे साहित्य उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाच्या अनुदानाचा योग्य वापर होणे गरजेचे आहे.

शासनाने तालुक्यातील सर्व ५४ वाचनालयांची विशेष मोहीम राबवून प्रत्यक्ष तपासणी करावी. वाचनालय सुरू आहे की नाही, कर्मचारी प्रत्यक्ष कामावर आहेत का, नियमानुसार वेळ पाळली जाते का, पुस्तकांची खरेदी होते का, वर्तमानपत्रे व मासिके उपलब्ध आहेत का, वाचकांची संख्या किती आहे आणि अनुदानाचा प्रत्येक रुपया कुठे खर्च झाला, याची तपासणी करावी.

केवळ अनुदानासाठी सुरू असलेली वाचनालये बंद करून त्याऐवजी सक्षम वाचनालये विकसित करावीत. गरज भासल्यास दोन–तीन गावांसाठी एक सक्षम वाचनालय सुरू करावे. अनुदानाचा गैरवापर आढळल्यास संबंधित वाचनालय चालकांसह जबाबदार अधिकाऱ्यांवरही कारवाई करावी, अशी मागणी तालुक्यातील वाचकांकडून होत आहे.

वाचनालय म्हणजे केवळ अनुदान घेणारी संस्था नव्हे, तर गावातील ज्ञानाचे केंद्र आहे. त्यामुळे शासनाने कागदावरील आकडे आणि प्रत्यक्ष परिस्थितीतील तफावत दूर करून तालुक्यातील वाचनालयांची वस्तुनिष्ठ तपासणी करणे काळाची गरज बनली आहे.



### तपासणीच्या निमित्ताने पोलखोल?

■ तालुक्यात सध्या एका व्यक्तीकडून वाचनालयांची झाडाझडती घेतली जात असल्याची चर्चा आहे. त्यामुळे काही वाचनालय चालकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून, 'आपल्याला कोणतीही अडचण नको' म्हणून संबंधित व्यक्तीचे आदरातिथ्य केले जात असल्याचीही चर्चा आहे. त्याचवेळी काही चालकांकडून इतर वाचनालयांकडे बोट दाखविले जात असल्याने तालुक्यात प्रत्यक्षात सुरू नसलेल्या वाचनालयांची पोलखोल होत असल्याचे बोलले जात आहे. या प्रकाराची वरिष्ठ पातळीवर स्वतंत्रपणे दखल घेऊन वस्तुस्थिती तपासण्याची गरज आहे.

### वाचकांसाठी की अनुदानासाठी?

■ वाचनालयात दररोज वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके आणि वाचनीय पुस्तके उपलब्ध असणे अपेक्षित आहे. अनुदानातील २५ टक्के रक्कम पुस्तक खरेदीवर खर्च करणे, तर ५० टक्के रक्कम कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी खर्च करण्याचे बंधन आहे. असे असताना प्रत्यक्ष वाचनालयात किती पुस्तके आहेत? शेवटची पुस्तक खरेदी कधी झाली? दररोज किती वाचक येतात? कर्मचारी नियमित उपस्थित असतात का? या प्रश्नांची उत्तरे प्रत्यक्ष तपासणीतूनच स्पष्ट होऊ शकतात. त्यामुळे केवळ कागदपत्रांची तपासणी न करता प्रत्यक्ष वाचनालयात जाऊन तपासणी करण्याची मागणी होत आहे.

---

# जिरेवाडीतील ७० तरुणांना शेतीपूरक व्यवसायाचे प्रशिक्षण




**● पाथर्डी । वीरभूमी –** ग्रामीण भागातील तरुणांना शेतीसोबत विविध शेतीपूरक व्यवसायांची माहिती मिळावी आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण व्हाव्यात, या उद्देशाने जिरेवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने अनोखा उपक्रम राबविण्यात आला. ग्रामपंचायतीच्या कौशल्य विकास उपक्रमांतर्गत १८ ते ४० वर्षे वयोगटातील ७० तरुणांना शेळीपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय आणि सेंद्रिय शेतीचे एकदिवसीय प्रशिक्षण देण्यात आले.

अहिल्यानगर येथील बॉस्को ग्रामीण विकास केंद्र, ग्रामीण प्रशिक्षण केंद्रात आयोजित प्रशिक्षण शिबिरात शेतीपूरक व्यवसाय सुरू करताना घ्यावयाची काळजी, विदेशी जातींच्या शेळ्या व कोंबड्यांचे संगोपन, त्यांना होणारे आजार व प्रतिबंधात्मक उपाय, पशुधनातील मृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या पद्धती, दुग्धोत्पादन वाढविण्याचे उपाय तसेच दुधाची गुणवत्ता व शुद्धता याबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

याशिवाय सेंद्रिय शेतीचे महत्त्व, रासायनिक खतांचा अतिरेक टाळून जमिनीचा पोत व सुपीकता टिकविण्याच्या पद्धती तसेच सेंद्रिय पद्धतीने उत्पादन वाढविण्याचे तंत्र याबाबतही तरुणांना माहिती देण्यात आली. बदलत्या शेती पद्धतींच्या पार्श्वभूमीवर सेंद्रिय शेती हा शाश्वत शेतीचा महत्त्वाचा पर्याय असल्याचे प्रशिक्षणातून अधोरेखित करण्यात आले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी लोकनियुक्त सरपंच लक्ष्मी आंधळे, उपसरपंच मनीषा आंधळे, अनिल आंधळे, नवनाथ आंधळे, माणिक कचरे, विष्णू आंधळे, शंकर आंधळे, राजेंद्र बडे, ग्रामसचिव अंबादास नजन व मुकुंद आंधळे यांनी विशेष परिश्रम घेतले. ग्रामपंचायतीच्या या उपक्रमामुळे जिरेवाडीतील तरुणांमध्ये शेतीपूरक व्यवसाय उभारण्याबाबत उत्साह निर्माण झाला आहे.

# माळेगाव-ने येथील विहिरीत पडलेल्या कोल्ह्यांच्या जोडीला जीवदान

## पाणवठे आटल्याने वन्यजीवांचा मानवी वस्तीकडे वाढता वावर



**● शेवगाव । वीरभूमी–** पावसाचे प्रमाण कमी झाल्याने नैसर्गिक पाणवठे आटत चालले असून, पाण्याच्या शोधात वन्यजीव मानवी वस्तीकडे वळत आहेत. त्यामुळे विहिरी, शेततळी आदी ठिकाणी वन्यजीव अडकण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. माळेगाव–ने येथे उत्तम जवादे यांच्या विहिरीत पडलेल्या दोन कोल्ह्यांची वनविभागाने ग्रामस्थांच्या मदतीने सुखरूप सुटका करून त्यांना नैसर्गिक अधिवासात मुक्त केले.

माळेगाव–ने (ता. शेवगाव) येथे उत्तम जवादे यांच्या विहिरीत दोन कोल्हे पडल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. नितीन माळी व हरिदास माळी यांनी प्रसंगावधान राखत तातडीने वनविभागाला माहिती दिली. माहिती मिळताच वनविभागाचे बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले. पथकाने विहिरीची खोली व कोल्ह्यांची स्थिती लक्षात घेऊन दोरी, शिडी व पिंजऱ्याच्या साहाय्याने नियोजनबद्ध पद्धतीने बचावकार्य सुरू केले.

काही काळाच्या प्रयत्नांनंतर दोन्ही कोल्ह्यांना कोणतीही इजा न होता सुरक्षितपणे विहिरीबाहेर काढण्यात वनविभागाला यश आले. त्यांची प्रकृती व्यवस्थित असल्याची खात्री केल्यानंतर त्यांना नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले.

दरम्यान, यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने अनेक नैसर्गिक पाण्याचे स्रोत आटले आहेत. त्यामुळे पाण्याच्या शोधात वन्यजीव मानवी वस्त्या, शेतातील विहिरी व अन्य जलस्रोतांकडे येत असल्याचे दिसून येत आहे. पाणी उपलब्ध असलेल्या ठिकाणी वन्यजीवांचा वावर वाढल्याने अशा घटना वारंवार घडण्याची शक्यता आहे.

त्यामुळे शेतकरी व ग्रामस्थांनी विहिरी तसेच अन्य जलस्रोतांजवळ वन्यजीव आढळल्यास त्यांना स्वतः पकडण्याचा प्रयत्न न करता तातडीने वनविभागाला माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

हे बचावकार्य वनपरिक्षेत्र अधिकारी मिलिंद गोवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल संदीप एकशिंगे, वनरक्षक बाळकृष्ण बडे, वन्यजीव बचावकर्ते सुशांत मनवरे, वनसेवक इंद्रभान चितळे व वाहनचालक शिवनाथ जिवडे यांनी पार पाडले. या कार्यात स्थानिक ग्रामस्थांनीही वनविभागाला मोलाचे सहकार्य केले.

---

# अकोल्यातील स्वामी समर्थ सेवा केंद्रात रंगला श्रीकृष्ण जन्मोत्सव

**● अकोले । वीरभूमी–** श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, अकोले येथे श्रीकृष्ण सुदामा भेटीचा भावस्पर्शी प्रसंग, मथुरा कारागृहातून वसुदेवांनी बाळकृष्णाला नदीपात्रातून नेण्याचा रोमांचकारी प्रसंग आणि स्वामी स्वरांजलीच्या भक्तिमय गीतांनी श्रीकृष्ण जन्मोत्सव रंगला. प्रसंग पाहताना सेवेकऱ्यांचे पाणावलेले डोळे आणि अंगावर आलेले शहारे कार्यक्रमाच्या भावपूर्ण वातावरणाची साक्ष देत होते.

श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या ३० व्या वर्धापन दिनानिमित्त श्रीकृष्ण जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. श्री स्वामी समर्थांच्या कृपेने हा वर्धापन दिन अत्यंत भक्तिमय, आनंदमय आणि अविस्मरणीय वातावरणात साजरा झाला.

श्रीकृष्ण जन्म, सुदामा भेट तसेच वसुदेव श्रीकृष्णाला नदीपात्रातून घेऊन जात असल्याचे प्रसंग हुबेहूब साकारण्यात आले. प्रत्येक पात्रातील जिवंतपणा आणि प्रसंगांची सुंदर मांडणी पाहून उपस्थित सेवेकरी भारावून गेले. या संपूर्ण सोहळ्यामागे सेवेकरी तथा मार्गदर्शक संजूकाका हुजबंद यांची कल्पकता, नियोजन व अथक परिश्रम जाणवले.

स्वामी सेवेकरी भजनी मंडळ, संगमनेर यांच्या रसाळ व भक्तिमय वाणीतून सादर झालेल्या भजनांनी संपूर्ण वातावरण स्वामीमय करून टाकले. भजनातील प्रत्येक शब्द मनाला स्पर्शून गेल्याने सेवेकरी भक्तिरसात तल्लीन झाले.

या सोहळ्यास आमदार डॉ. किरण लहामटे उपस्थित होते. मध्यरात्री १२.३९ वाजता गीतेच्या १८ व्या अध्यायाचे वाचन करण्यात आले. त्यानंतर 'गोपाल कृष्ण भगवान की जय'च्या घोषणांनी केंद्राचा परिसर दुमदुमून गेला. 'गोविंद बोलो हरी गोपाल बोलो' या भक्तिगीतावर सेवेकऱ्यांसह आमदार डॉ. किरण लहामटे यांनी धरलेला ताल उपस्थितांमध्ये उत्साह व आनंद निर्माण करून गेला. सेवेकऱ्यांची मोठी मांदियाळी आणि त्यांच्या चेहऱ्यावरील आनंदामुळे वर्धापन दिनाची भव्यता व भावपूर्णता जाणवत होती. सुंदर सूत्रसंचालन तसेच स्वामी मार्गातील सेवेकऱ्यांनी कथन केलेले अनुभव यामुळे अनेक सेवेकरी भावुक झाले.



सेवेकरी संजूकाका हुजबंद यांच्या मार्गदर्शनाखाली महिला सेवेकऱ्यांनी श्रीकृष्ण, राधा, सुदामा, बलराम यांसह विविध पात्रे उत्तमरीत्या साकारली. संपूर्ण नाट्याचे दिग्दर्शन, नेपथ्य व प्रकाशयोजना स्वप्नील कांडेकर यांनी, तर ध्वनिक्षेपक व्यवस्था सचिन ढेकणे यांनी सांभाळली.

यावेळी सातारा, मुंबई, अहिल्यानगर तसेच अकोले तालुक्यातील कुंभेफळ, निंब्रळ, चितळवेढे यांसह विविध केंद्रांतील अनेक सेवेकरी उपस्थित होते.

# गणेशोत्सव शांततेत, शिस्तीत व पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करा

## नियमभंग केल्यास पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांचा कारवाईचा इशारा । शेवगाव तहसील कार्यालयात शांतता समितीची बैठक

**● शेवगाव । वीरभूमी–**

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मिरवणुका शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडाव्यात, ध्वनीप्रदूषणाला आळा घालावा तसेच पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेऊन पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी केले. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.**



गणेशोत्सवाच्या नियोजनासाठी आयोजित बैठकीत नागरिक व गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी विविध समस्या व सूचना मांडल्या. मिरवणुकीत सर्व मंडळांना समान वेळ देण्यात यावा, उत्कृष्ट मंडळांसाठी बक्षीस स्पर्धा आयोजित करावी, रात्रीच्या वेळी वीजपुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता घ्यावी, बाहेरील मंडळांना मिरी रस्त्यावर मंडप उभारण्यास परवानगी देऊ नये, तसेच 'एक गाव, एक गणपती' उपक्रमासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना करण्यात आल्या.

डीजेवर पूर्णपणे बंदी घालावी, महावितरणने नवीन वीज जोडणीसाठीचे डिपॉझिट कमी केल्यास वीजचोरीचे प्रकार कमी होतील, शहरातील व तालुक्यातील रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजवावेत, गणेश मंडळांच्या परिसरातील जुगार व अवैध दारूविक्रीला आळा घालावा, अशा मागण्याही नागरिकांनी केल्या.

सध्या पाण्याची तीव्र टंचाई असल्याने मोठ्या गणेशमूर्तींचे नदीपात्रात विसर्जन न करता कृत्रिम टाक्यांचा वापर करावा, पर्यावरणपूरक मूर्तींना प्राधान्य द्यावे, अशी सूचना करण्यात आली. नगरपरिषदेने अतिक्रमण हटविल्याने छोट्या–मोठ्या व्यावसायिकांसाठी पर्यायी व्यवस्था करावी, शिवाजी महाराज चौकातील उघडे गटार तातडीने बंद करावे आणि शहरातील बंद असलेले हायमॅक्स दिवे सुरू करावेत, अशी मागणीही करण्यात आली.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता प्रल्हाद पाठक यांनी मिरी व नेवासा रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे आश्वासन दिले. अरुण मुंढे यांनी नगरपरिषदेच्या माध्यमातून गणेशोत्सवाच्या मिरवणुका सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असे सांगितले. नेवासा रस्त्यावरील ढोरा नदीपात्रात मोठ्या मूर्तींचे क्रेनच्या साहाय्याने विसर्जन करून त्या पुन्हा मूर्तिकारांकडे सुपूर्द करण्याची व्यवस्था केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मिरवणूक मार्गावरील खड्डेही बुजविण्यात येतील, अशी माहिती त्यांनी दिली. उदय भारद्वाज यांनी तिसगाव रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजविण्यात येतील, असे सांगितले.

पोलीस अधीक्षक मुम्मका म्हणाले, शेवगावमधील नागरिक जागरूक असल्यामुळे आतापर्यंत कोणतीही अनुचित घटना घडलेली नाही. जिल्हा ध्वनीमुक्त करण्याच्या दृष्टीने कठोर पावले उचलण्यात आली असून डीजेचा वापर करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. मंडळांनी पारंपरिक वाद्यांना प्राधान्य द्यावे.

दुष्काळाची परिस्थिती असतानाही एका गल्लीमध्ये अनेक मंडळे स्थापन करून मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो. त्याऐवजी 'एक गाव, एक गणपती' ही संकल्पना राबविण्यासाठी धर्म–जात बाजूला ठेवून एकजुटीने प्रयत्न करावेत. विसर्जनासाठी कृत्रिम टाक्यांचा वापर करून पाण्याची बचत करावी. नदीपात्रात कोणतीही दुर्घटना होणार नाही, यासाठी मंडळांनी आणि प्रशासनाने दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

एका मिनिटाच्या मजेसाठी संपूर्ण आयुष्य धोक्यात घालू नका. सर्व सण–उत्सव नियमांचे पालन करून साजरे करा. कोणतेही गैरकृत्य खपवून घेतले जाणार नाही. नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. तालुक्यातील सराईत गुन्हेगारांची यादी तयार करून आवश्यकतेनुसार त्यांच्यावर तडीपारीची कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

गणेश मंडळांनी केवळ मनोरंजनात्मक कार्यक्रम न घेता तालुक्यातील धार्मिक व ऐतिहासिक महत्त्वाची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच नशामुक्ती, वाहतूक नियम, पॉक्सो कायदा आदींबाबत जनजागृती करणारे फलक पोलीस प्रशासनाच्या वतीने मंडळांच्या ठिकाणी लावण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू, तहसीलदार आकाश दहाडदे, पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, अरुण मुंढे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता प्रल्हाद पाठक, पंचायत समितीचे सचिन भाकरे, महावितरणचे अधिकारी यांच्यासह गणेश मंडळांचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

बैठकीत अमोल फडके, नगरसेवक संतोष जाधव, डॉ. मेधा कांबळे, मीना कळकुंबे, बाळासाहेब विघ्ने, दत्ता फुंदे, आजीनाथ ढाकणे, अविनाश देशमुख, बाळासाहेब फटांगडे, डॉ. नीरज लांडे, प्रकाश तुजारे आदींनी विविध समस्या व सूचना मांडल्या. प्रास्ताविक पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांनी केले, तर सूत्रसंचालन सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर मुटेकर यांनी केले. तर पो कॉ. शाम गुंजाळ यांनी आभार मानले.

# लोणी हवेलीच्या अक्षय कोल्हे, शुभम दुधाडे यांची लेफ्टनंटपदी वाटचाल; गया येथील खडतर प्रशिक्षण पूर्ण

**● पारनेर । वीरभूमी–**

लोणी हवेली (ता. पारनेर) येथील अक्षय विठ्ठल कोल्हे आणि शुभम पोपट दुधाडे या दोन सुपुत्रांनी भारतीय लष्करातील अधिकारी पदासाठीचे खडतर व प्रतिष्ठेचे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. बिहारमधील ऑफिसर ट्रेनिंग अकॅडमी (जढ–), गया येथे त्यांनी लेफ्टनंट पदाचे प्रशिक्षण पूर्ण केले.



अक्षय विठ्ठल कोल्हे हे सेवानिवृत्त ऑनररी कॅप्टन विठ्ठल कोंडीबा कोल्हे यांचे सुपुत्र, तर शुभम पोपट दुधाडे हे ऑनररी सुभेदार मेजर पोपट चंदर दुधाडे यांचे सुपुत्र आहेत. दोघांनी बारावीपर्यंत आर्मी स्कूलमध्ये शिक्षण घेतल्यानंतर बी.ई. इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर एसएससी टेक्निकल एंट्रीद्वारे त्यांची भारतीय लष्करातील अधिकारी प्रशिक्षणासाठी निवड झाली.

दोन्ही युवा अधिकाऱ्यांनी २४ सप्टेंबर २०२५ ते ५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत जढ–गया येथे एक वर्षाचे कठोर लष्करी प्रशिक्षण पूर्ण केले. या प्रशिक्षणात शारीरिक क्षमता, मानसिक कणखरता, नेतृत्वगुण, शिस्त, लष्करी डावपेच, युद्धकौशल्य तसेच आव्हानात्मक परिस्थितीत योग्य निर्णय घेण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

लहानपणापासूनच देशसेवेची प्रेरणा मनात ठेवून अक्षय आणि शुभम यांनी मेहनत, जिद्द व सातत्याच्या जोरावर हे यश संपादन केले. त्यांच्या यशामागे आई–वडील, कुटुंबीय, शिक्षक, मार्गदर्शक आणि मित्रपरिवाराचे मोलाचे योगदान आहे.

दोघांच्या यशामुळे लोणी हवेली गावासह पारनेर तालुक्यात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून, परिसरातील युवकांसाठी त्यांची वाटचाल प्रेरणादायी ठरत आहे. 'देशसेवा हीच सर्वोच्च सेवा' या भावनेने दोन्ही अधिकारी आता मातृभूमीच्या सेवेसाठी सज्ज झाले आहेत.

अक्षय कोल्हे व शुभम दुधाडे यांच्या यशाबद्दल अहिल्यानगर जिल्हा भाजपचे उपाध्यक्ष सुभाष दुधाडे, सरपंच जान्हवीताई दुधाडे, उपसरपंच अमोल दुधाडे, ग्रामपंचायत सदस्य, विविध कार्यकारी सोसायटीचे पदाधिकारी, ग्रामस्थ, नातेवाईक, शिक्षक, मित्रपरिवार, माजी सैनिक तसेच विविध सामाजिक संस्थांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# वसुंधरा अकॅडमीत गोकुळाष्टमीचा जल्लोष

## श्रीकृष्णाच्या जयघोषात दहीहंडी उत्सव । विद्यार्थ्यांच्या नृत्य-गायनाने रंगला सोहळा

**● अकोले । वीरभूमी–**

अभिनव शिक्षण संस्थेच्या वसुंधरा अकॅडमीत गोकुळाष्टमीचा सण मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. श्रीकृष्णाचे जीवनमूल्य, शिकवण आणि भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी संपूर्ण वातावरण कृष्णमय झाले.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व श्रीकृष्णाच्या मूर्तीचे पूजन करून करण्यात आली. अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक मधुकरराव नवले यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. यावेळी वसुंधरा अकॅडमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, उपप्राचार्या राधिका नवले, मारुतीराव कोते पब्लिक स्कूलच्या प्राचार्या अल्फोन्सा डी., सिनिअर कॉलेजच्या प्राचार्या कुसुम वाकचौरे, ज्युनिअर कॉलेजच्या विभागप्रमुख पुंड मॅडम यांच्यासह संस्थेतील इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मधुकरराव नवले यांनी विद्यार्थ्यांना श्रीकृष्णाचा महिमा, त्यांचे जीवनकार्य तसेच भगवद्गीतेतील मूल्यांची माहिती देत मार्गदर्शन केले. श्रीकृष्णाने दिलेला कर्म, कर्तव्य, सत्य व धर्माचा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात आचरणात आणावा, असे आवाहन त्यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह व सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली.

यानंतर विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या जीवनावर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. 'गोविंद बोलो, हरी गोपाल बोलो' या गीतावर विद्यार्थ्यांनी मनमोहक नृत्य सादर केले. या नृत्याला प्रशांत दिवेकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच 'श्रीकृष्ण महिमा' हे भक्तिगीत विद्यार्थ्यांनी सुरेलपणे सादर केले. या गीतासाठी इंद्रभान कोल्हाळ यांचे मार्गदर्शन लाभले.

मारुतीराव कोते पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी 'गोविंदा आला रे, गोविंदा आला' या गीतावर उत्स्फूर्त नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीही श्रीकृष्णावर आधारित नृत्य सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेला अभिनव शिक्षण संस्थेचा सामूहिक दहीहंडी सोहळा मोठ्या जल्लोषात पार पडला. ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी एकजुटीने दहीहंडी फोडताच परिसर श्रीकृष्णाच्या जयघोषाने व टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेला. त्यानंतर सर्वांनी सामूहिक नृत्य करत गोपालकाल्याचा आनंद लुटला. उपस्थितांना गोपालकाल्याच्या प्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत मंडलिक, वसुंधरा अकॅडमीच्या सोनिया कोल्हे व काळे मॅडम यांनी केले. शिक्षकांच्या नियोजनबद्ध मेहनतीतून व सहकार्याने हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

# आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त महाविद्यालयीन तरुणाईचा 'रेड रिबन क्लब'च्या माध्यमातून एड्समुक्तीचा जागर

**● पारनेर । वीरभूमी–**

एड्ससारख्या गंभीर आजाराबाबत समाजात आजही अनेक गैरसमज आणि भीतीचे वातावरण आहे. एड्सचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनातून जनजागृती करणे आणि युवकांना आरोग्यविषयक जबाबदारीची जाणीव करून देणे आवश्यक आहे. या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी स्थापन केलेल्या 'रेड रिबन क्लब'च्या माध्यमातून पारनेर येथील महाविद्यालयीन तरुणाईने एड्स प्रतिबंध व जनजागृतीसाठी पुढाकार घेतला.




आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात युवकांमध्ये आरोग्यविषयक सजगता निर्माण करण्यासाठी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी एड्स आयसीटीसी समन्वयक विकास वाळुंज यांनी विद्यार्थ्यांना एड्सची कारणे, संक्रमणाचे मार्ग तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांनी पारनेर ग्रामीण रुग्णालयातील आयसीटीसी (एकात्मिक समुपदेशन व चाचणी केंद्र) येथे विशेष अभ्यासभेट देऊन प्रत्यक्ष वैद्यकीय कार्यप्रणालीची माहिती घेतली.

या अभ्यासभेटीदरम्यान तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रियंका शिरसाठ आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. लोंढे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना आरोग्य यंत्रणेच्या कामकाजाची माहिती देण्यात आली. विकास वाळुंज आणि प्रयोगशाळा तंत्रज्ञ परिचर रूपाली देशमुख यांनी आयसीटीसी केंद्राची कार्यपद्धती, विविध वैद्यकीय चाचण्या, रक्त तपासणीची प्रक्रिया तसेच संशयित रुग्णांचे समुपदेशन याबाबत सविस्तर माहिती दिली.

एड्सग्रस्त व्यक्तींना भेदभावाची वागणूक न देता त्यांच्याशी संवेदनशीलतेने वागणे, तसेच एड्सविषयीची शास्त्रीय माहिती समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. प्राणीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत प्रयोगशाळेतील तांत्रिक प्रक्रिया जाणून घेतल्या.युवा वर्गाच्या सक्रिय सहभागामुळे पारनेर तालुक्यात एड्स प्रतिबंध आणि आरोग्य जनजागृतीला मोठे बळ मिळेल, असा विश्वास वैद्यकीय अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रकाश गावित, प्रा. नितीन निपुंगे, डॉ. माया लहारे, प्रा. महेश आहेर, प्रा. समीर दळवी, रेड रिबन क्लबचे विद्यार्थी प्रतिनिधी साहिल तांबोळी यांच्यासह मोठ्या संख्येने स्वयंसेवक उपस्थित होते.

# कोपरगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसची कार्यकारिणी लवकरच जाहीर होणार

**● कोपरगाव । वीरभूमी–**

कोपरगाव राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत करण्यासाठी कोपरगाव शहरात विविध विभागांच्या कार्यकारिण्या गठित करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. समाजातील विविध घटकांना पक्षाच्या माध्यमातून जनसेवेशी जोडून घेताना युवक, महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांना संघटनेत सक्रिय भूमिका देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या विविध विभाग व सेलच्या कार्यकारिण्या लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. यामध्ये राष्ट्रवादी युवक काँग्रेस, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस, राष्ट्रवादी महिला काँग्रेस, राष्ट्रवादी युवती काँग्रेस, ओबीसी विभाग,अल्पसंख्याक विभाग, सामाजिक न्याय विभाग, सोशल मीडिया विभाग, ज्येष्ठ नागरिक विभाग, डॉक्टर सेल,वकील सेल, सेवा दल तसेच सांस्कृतिक व क्रीडा आदी विभागाचा समावेश असणार आहे.

आ. आशुतोष काळे यांच्या नेतृत्वाखाली कोपरगाव शहरासह मतदारसंघातील विविध विकासकामांना गती मिळाली असून शासनाच्या लोककल्याणकारी योजना आणि विकासकामांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पक्ष संघटनेच्या माध्यमातून भविष्यात व्यापक जनसंपर्क अभियान राबविण्यावर भर दिला जाणार आहे. विशेषतः युवक–युवतींना संघटनेत मोठी संधी, महिलांचा वाढता सहभाग, सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रभावी जनसंवाद तसेच डॉक्टर, वकील, ज्येष्ठ नागरिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तींना संघटनेशी जोडण्याचा प्रयत्न या आगामी कार्यकारीणीच्या माध्यमातुन केला जाणार आहे.

शहरातील विविध समाजघटक, युवक, महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या कार्यकर्ते व नागरीकांना पक्षाच्या संघटनात्मक कार्याशी जोडून घेण्याच्या दृष्टीने या कार्यकारिण्यांना विशेष महत्त्व आहे. प्रत्येक घटकाचा पक्षाच्या माध्यमातून जनसेवेत सक्रिय सहभाग वाढविणे, नागरिकांशी थेट संवाद साधणे आणि त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रभावीपणे पाठपुरावा करणे, हा या संघटनात्मक विस्तारामागील प्रमुख उद्देश आहे. या उद्देशाने पक्षाच्या कामाला अधिक गती मिळणार आहे. आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच या सर्व विभागांच्या कार्यकारिण्यांची अधिकृत घोषणा करण्यात येणार आहे.